Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ. स. न. ८३२-ए, फायनल.प्लॉ.नं. १७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 I EPABX -25705000 I
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र रा.मं./परीक्षा–३/५३७०
पुणे– ४११ ००४.
दिनांक – ०३/१०/२०२३
04/10/2023

प्रति,
विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे.

विषय :– माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा खाजगी विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या स्वाध्याय पुस्तिका मंडळ संकेतस्थळावर पी.डी.एफ. (pdf) स्वरुपात उपलब्ध करुन देण्याबाबत.

संदर्भ :– या कार्यालयाचे पत्र क्र. रा.मं./परीक्षा–३/३४६७, दिनांक – ०८/०८/२०२३.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी थेट अर्ज योजना ही सुलभ व विद्यार्थी केंद्रीत व्हावी या दृष्टीने सध्याची संपर्क केंद्रामार्फत नावनोंदणी करण्याची कार्यपध्दती बंद करून, खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज सर्व मान्यताप्राप्त शाळांमधून स्विकारण्याबाबतची कार्यपध्दती मार्च २०२४ च्या परीक्षेपासून निश्चित करण्यात आलेली असून इ. १०वी खाजगी विद्यार्थ्यांसाठी लागणाऱ्या स्वाध्याय पुस्तिका मार्च–२०२४ परीक्षेपासून महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात येतील असे उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आले होते.

या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना द्वितीय भाषा(इंग्रजी/मराठी), गणित, समाजशास्त्र या विषयांच्या स्वाध्याय पुस्तिका ऑनलाईन पध्दतीने मंडळाच्या खाली दिलेल्या संकेतस्थळावर दिनांक ०४/१०/२०२३ पासून इंग्रजी, मराठी, हिंदी व उर्दू अशा चार माध्यमांमध्ये उपलब्ध करुन दिल्या जातील –

१) http://form17.mh-ssc.ac.in
२) http://mahahsscboard.in

| अ.क्र | विषय | माध्यम |
|---|---|---|
| १ | मराठी (द्वि/तृ) | मराठी |
| २ | इंग्रजी (द्वि/तृ) | इंग्रजी |
| ३ | गणित भाग १ व २ | मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू |
| ४ | इतिहास–राज्यशास्त्र | मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू |
| ५ | भूगोल | मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू |

तसेच विज्ञान विषयासाठी प्रात्यक्षिक परीक्षा असल्याने सदर विषयासाठी स्वाध्याय पुस्तिका राहणार नाहीत.

(कृ.मा.प.)

पुणे विभागीय मंडळ, पुणे-४११ ००५
05 OCT 2023
17939
आवक क्रमांक:-

सदर स्वाध्याय पुस्तिका विद्यार्थ्यांना फक्त सरावासाठी देण्यात येत आहे, तसेच मान्यता प्राप्त शाळांनी खाजगी विद्यार्थ्यांची नियमित विद्यार्थ्यांप्रमाणे तोंडी, अंतर्गत मूल्यमापन, प्रात्यक्षिक व श्रेणी विषयांची परीक्षा घेऊन सदर परीक्षांचे गुण विहीत मुदतीत विभागीय मंडळाकडे सादर करणे अनिवार्य आहे तसेच नियमित विद्यार्थ्यांप्रमाणे त्यांचे सर्व रेकॉर्ड शाळेच्या दफ्तरी ठेवणेबाबत संबंधित शाळांना आपल्या स्तरावरुन सूचित करावे.

तरी आपल्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांना इ. १०वी खाजगी विद्यार्थ्यांना सरावासाठी स्वाध्याय पुस्तिका मंडळाच्या सदर संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आल्याबाबत आपल्या स्तरावरुन सूचित करण्यात यावे.

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे–०४.

प्रत माहितीस्तव तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव–

१) व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ, पुणे.

२) शाखा– ऑनलाईन, राज्य मंडळ, पुणे.

---

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**पुणे विभागीय मंडळ, पुणे-४११००५**

पत्र क्र./पुविमं/खा .वि./6112
पुणे-४११००५
दि.१२/१०/२०२३ 13

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व माध्यमिक शाळा/विद्यालय,
पुणे/अहमदनगर/सोलापूर.

राज्य मंडळाच्या उपरोक्त क्र.रा.मं./परीक्षा-३/४३७०, दि. ०४/१०/२०२३ रोजीच्या पत्रानुसार इ. १० वी खाजगी विद्यार्थ्यांसाठी लागणाऱ्या स्वाध्याय पुस्तिका मार्च २०२४ परीक्षेपासून महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या संकेतस्थळावर **http://mahahsscboard.in** आणि खाजगी विद्यार्थी नाव नोंदणी संकेतस्थळावर **http://form17mh-ssc.ac.in** ऑनलाईन स्वरूपात दि. ०४/१०/२०२३ पासून इंग्रजी, मराठी, हिंदी व उर्दू अशा चार माध्यमांमध्ये उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्या बाबतच्या सविस्तर सूचना उपरोक्त पत्रात नमूद केलेल्या आहेत. तरी सदर बाबत सर्व संबंधित विद्यार्थी, शिक्षक व पालकांना निदर्शनास आणून देऊन पुढील कार्यवाही करण्यात यावी.

(औदुंबर उकिरडे)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे-४११००५.